आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचे अर्थशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)

2010.2023”

स्वामी रामांद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव्य विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी संपादन करण्याकरिता सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा.

संशोधक

विकास संभाजी ढोले

सामाजिकशास्त्रे विद्या संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ.डी.के.मगर

पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि.नांदेड.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे विद्या संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड
डिसेंबर - २०२२

"आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचे अर्थशास्त्रीय अध्ययन
(विशेष संदर्भ नांदेड जिल्हा)
२०१०.२३"

१. प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३.०६ लक्ष चौ.कि.मी. असून त्यातील ०.५० लक्ष चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपाययोजनाखाली येते राज्याच्या एकूण क्षेत्राशी प्रमाण १६.४९ टक्के आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील एकूण लोकसंख्या ११२३.६४ लक्ष असून या लोकसंख्येत राज्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या १०५.१० लक्ष आहे या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी ९.३५ टक्के प्रमाण असल्याने दिसून येते या आदिवासीच्या एकूण लोकसंख्येपैकी ६९.०५ टक्के लोकसंख्या (TSP-Tribal Sub Plan) आदिवासी उपयोजना क्षेत्रात वास्तव्यास असून ३०.९५ टक्के आदिवासीची लोकसंख्या (OTSP-Other Tribal Sub Plan) आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर वास्तव्य करतांना दिसून येते.

महाराष्ट्रातील एकून लोकसंख्येपैकी ९.३५ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात चौथा क्रमांक लागतो. राज्यातील बहुतांश आदिवासी ठाणे,नाशिक,धुळे,जळगाव,अहमदनगर,पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, रायगड या जिल्हयांत केंद्रित आहे. आदिवासी जमातीचा विचार करता त्यात भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी,ठाकर, गावीत,कोलाम,कोरकु, आंध, मल्हार कोळी, धोंडिया, दुबळा, मांडिया गोंड, परधान, पारधी हया जमातीचा प्रामुख्याने समावेश होतो.

आदिवासी लोक शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत.२०११ च्या जनगणनेनूसार राज्यातील साक्षरता एकूण प्रमाण ८१.३ टक्के असून राज्यातील आदिवासी साक्षरतेचे एकूण प्रमाण ६५.६ असल्याचे दिसून येते. तर दोन्हीतील साक्षरता फरक १६.६ टक्के असल्याचे स्पष्ट होते.

स्त्री शिक्षणाचे प्रमाण आदिवासींमध्ये फार कमी म्हणजे फक्त २४.०३ टक्के असल्याचे आढळून येते. आदिवासी आर्थिकदृष्ट्या फारच मागासलेले आहेत. त्याचा मुख्य धंदा शेतमजूरी असून सुमारे ८५ टक्के लोक शेतीवर उपजिवीका भागवितात. त्यात ४० टक्के लोक शेती करणारे व ४५ टक्के लोक शेतमजूर करणारे आहेत. शेतीव्यतिरिक्त आदिवासी लोक चट्या, टोपल्या तयार करणे, जंगलातील वनौपजे गोळा करणे, गवत कापणे इत्यादी धंदे करतात. त्याची राहणी साधी व गरजा मर्यादित आहेत.

भौगोलिक क्षेत्र आणि जमातीची विभागणी :

महाराष्ट्र राज्यात आदिवासी लोक ज्या भागात राहतात त्या भागाचे भौगोलिकदृष्टया तीन विभाग पडतात.

१. सहयाद्री विभाग :

सहयाद्री पर्वताच्या विभागात महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी, मल्हार कोळी या जमातीची वस्ती आढळते. महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येचे हे प्रमाण ३८ टक्के आहे.

२. सातपुडा पर्वत :

सातपुडा पर्वताच्या रांगामध्ये भिल्ल, कोकणा, गावीत, दुबळा, कोरकू, धानका, तडवी, पावरा या जमाती राहतात. या विभागात धुळे, जळगाव, औरंगाबाद, अमरावती या जिल्हयाचा समावेश होतो.

३. गौडवना विभाग

विदर्भातील डोंगराळ आणि जंगलमय प्रदेशात विशेषत: चंद्रपूर, भंडारा गडचिरोली, यवतमाळ, नागपूर या जिल्हयात गौड, माडिया गौंड, कोरकू, कोलाम, परधान, आंध, हया जमाती राहतात भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणा,कातकरी, ठाकर, गावीत, मल्हार कोळी,कोलाम, कोरकू हया प्रमुख अनूसूचित जमातीचे लोकसंख्या

महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ८०% आहे. १ लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या जमातीत हया जमातीचा समावेश होतो.

समाजकल्याण विभागांतर्गत आदिवासी कल्याण हा विभाग १८७२ सालापर्यंत कार्यरत होता. १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना झाली व पुढे १९७३ साली आदिवासी कल्याण विभाग स्वांतत्र्य करण्यात आला. परंतू काही काळ समाजकल्याण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालीच या विभागाचे काम चालू होते सन १९७४-७६ साली राज्याला आदिवासी उपयोजना लागू झाली. त्यामूळे विकास कार्याची दिशा केवळ कल्याणकारी योजना अशी न राहता ती विकास योजना (Welfare Schemes to Development Schemes) अशी करण्यात आली. समूह विकासाबरोबर क्षेत्र विकास असे नियोजनाचे सूत्र ठरविण्यात आले. क्षेत्र विकास कार्यक्रमातून आदिवासी भागातील साधनसंपत्तीची वृध्दी होईल व त्याचा फायदा पर्यायाने आजूबाजूच्या आदिवासी समूहांना होईल. आदिवासींचे जीवन ज्या साधनावर उदा. जमीन, जंगल आणि जलनिर्भर आहे त्याच्या विकास कार्यक्रमातून आदिवासींना संपन्न साधनसामग्रीचा फायदा मिळेल असा दृष्टीकोण स्वीकारण्यात आला समूह विकासाच्या योजनाबरोबर क्षेत्र विकास कार्यक्रमानुसार १९७५-७६ या कार्यक्रमाच्या अमलबजावणीसाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणेची नितांत गरज होती. त्यासाठी आदिवासी विकास विभाग, सहकारी आदिवासी विकास महामंडळ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अशा राज्य पातळीवर वेगवेगळया कामासाठी प्रशासकीय यंत्रणा उभ्या करण्यात आल्या. त्यातूनच प्रादेशिक व जिल्हा कार्यालय निर्माण झाली. व आदिवासी विकासाची स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा आस्तित्वात आली.

२. संशोधन विषयाची निवड

आदिवासी हे भारतातील मुलनिवासी असून निसर्गाची आराधना व संरक्षण करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. आदिवासी संस्कृती वैशिष्ट्यपुर्ण असून त्याची

जोपासणा ते आजही करीत आहेत. आधुनिकीकरण व जागतीकीकरणाच्या युगात सूध्दा आदिवासी समुदाय कोसो दुर असल्याचे दिसून येते. आदिवासींचा शैक्षणिक व आर्थिक व सामाजिक विकासाचा वेग मंद असलेला दिसूनयेतो आधुनिकीकरणाच्या जगात ज्याची उकल करने आदिवासी विकासासंदर्भात अत्यंत महत्वाचे ठरते.

आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनामूळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे काय? त्याचे जीवनमान सुधारले आहे काय? त्याच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा झाली काय? त्यांच्या आरोग्य, दारीद्र्य, कुपोषण व स्थलांतराचे प्रमाण कमी झाले आहे काय? प्रथा, परंपरा,अंधाश्रध्दाचा, व्यसनधिनतेचा पगडा कमी झाला काय? आदिवासी कल्याणकारी योजनाची पुरेपुर अंमलबजावणी केली जाते काय? त्यांच्या शैक्षणिक स्थितीत सुधारणा झाली काय? या हेतूने आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचे अर्थशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयाची निवड करण्यात आली आहे.

आदिवासी जमातीच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरा, आर्थिक जीवन, शैक्षणिक स्थिती, सामाजिक स्थिती, आरोग्य, दारिद्र्य, कुपोषण, स्थलांतर व्यसनाधिनता, इत्यादी या सर्व बाबीमुळे आदिवासी जमातीचे अध्ययन करणे फार महत्वाचे ठरते. स्त्रियाच्या उत्थानाबाबत आधुनिक जग वाटचाल करतांना नांदेड जिल्हयाच्या संदर्भात आदिवासी कल्याणकारी योजनाची आखणी करण्यासाठी आदिवासी जमातीचे अध्ययन उपयुक्त ठरते. यापुर्वीच्या आदिवासी कल्याणकारी योजनांचा लाभ किती आदिवासी जमातींच्या लोकांना मिळाला? आदिवासी जमातीला योजनाचा प्रत्यक्ष मिळालेला लाभ किती त्यामधून आदिवासी जमातीचा विकास किती झाला? कोणत्या शासकीय योजना सुरु ठेवाव्यात? या सर्व प्रश्नांच्या अनुषगाने,‘आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचे अर्थशास्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ नांदेड जिल्हा’ या विषयाची निवड करण्यात आली.

३. संशोधनाचे उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनासाठी आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचे अर्थशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) या प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी संशोधकाने पुढील प्रमाणे उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत.

१. आदिवासी जमातीची पार्श्वभुमी जाणून घेणे.
२. आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचे अध्ययन करणे.
३. आदिवासी जमातीच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.
४. आदिवासी जमातीच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
५. आदिवासी जमातीतील आरोग्य व दारिद्रयाच्या स्थितीचे अध्ययन करणे.
६. आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांच्या परिपूर्ण अमलबजावणीसाठी शिफारस करणे.

४. संशोधनाची गृहितकृत्ये

कोणत्याही अध्ययन विषयाचे संशोधकाला वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करावे लागते.यासाठी संशोधकाला त्या विषयाचे पुर्वज्ञान व अनुभव असावा लागतो आणि या अनुभवाच्या आधारे संशोधक संशोधन विषयी संबंधित गृहितके निश्चित करीत असतो प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनासाठी संशोधकाने पुढील प्रमाणे गृहितकृत्ये निश्चित केली आहेत.

१. नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीचे वास्तव्य विशिष्ट भुभागावर असल्याचे दिसून येते.
२. आदिवासी जमातीकरीताकल्याणकारी योजना लागू आहेत.
३. आदिवासी स्त्री पुरुषाचा दर्जा समानतेवर आधारित आहे.
४. आदिवासींसाठीच्या कल्याणकारी योजनामुळे शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे.

५. आदिवासी जमातीतील आर्थिक स्थिती हलाखीची असून कल्याणकारी योजनामुळे सुधारणा होत आहेत.

६. आदिवासी जमातीतीत दारीद्रयाचे प्रमाण अधिक आहे.

७. आदिवासी जमातीत आरोग्याच्या स्थितीत काहीस्या प्रमाणात सुधारणा होत आहेत.

५. संशोधनाचे महत्व :

नांदेड जिल्हयाच्या संदर्भात आदिवासी कल्याणकारी योजनांची आखणी करण्यासाठी आदिवासी जमातीचे अध्ययन करणे उपयुक्त ठरते आदिवासी जमातीच्या अध्ययनाचे महत्व पुढील बाबींवर दिसून येते.

१. आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांच्या अध्ययनामुळे ज्ञानात वाढ होईल.

२. आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनामुळे प्राप्त योजना व प्रत्यक्ष मिळालेला लाभ या बाबत माहिती मिळण्यास मदत होईल.

३. आदिवासी जमातीच्या सखोल अध्ययनामुळे त्यांच्या आरोग्य, कुपोषण, स्थलांतर, शोषण, पिळवणूक यासारख्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व इतर समस्या कळण्यास मदत होते.

४. आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचे महत्व म्हणजे आदिवासी कल्याणकारी योजनाची अंमलबजावणी करतांना केंद्र सरकार , राज्य सरकार, जिल्हा प्रशासन, आदिवासी विकास विभाग यांच्यासाठी महत्वपूर्ण आहे.

५. संशोधन विषय हा आदिवासी समाज व त्यांच्या कल्याणकारी योजनांशी सबंधीत असल्याने आदिवासी समाजातील जाणकार लोकांसाठी महत्वाचा आहे.

६. अध्ययन विषय हा आदिवासी समाजाची सबंधीत असल्याने या संशोधनाचा विदयार्थी, समाजसेवक, समाज सुधारक, सेवाभावी संस्था, आदिवासी विकास विभाग, प्रशासन, राज्य सरकार व केंद्र सरकार यांना योजनाची अंमलबजावणी करतांना महत्वाचा ठरेल.

६. संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत अध्ययन प्राथमिक व द्वितीय सामग्रीवर अधारीत आहे. वेगवेगळया पध्दतीने संकलीत केलेली शासकीय आकडेवारी, शासकीय गोपनीय माहिती व उपलब्ध असलेल्या अपुर्ण माहितीमूळे सामग्री संकलनावर मर्यादा पडतात. काही वेळेस डोंगराळ भागातील आदिवासी लोकांकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध होणार नाही ही माहिती अपूरेपणाची मर्यादा राहिल.

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तूत अध्ययन हे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट अंतर्गत नांदेड जिल्हयातीजल आदिवासी बहूल लोकसंख्या असलेल्या किनवट, माहूर, हदगाव, हिमायतनगर, भोकर या अशा अंश:तहा आदिवासी उपयोजना असलेल्या तालूक्यातील आदिवासी विकास योजनांशी सबंधीत निवडक लाभाधारकापुरतेच मर्यादित राहिल.

७. पुर्व संशोधन साहित्याचाआढावा :

प्रस्तुत संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी यापुर्वीच्या संशोधन साहित्याचा आढावाघेण्यात येईल काही प्रमुख संदर्भ साहित्याचा आढावा पुढील प्रमाणे.

१. गारे, गोविंद, (२००१) यांनी ‘महाराष्ट्रातील आदिवासी जमाती’ या ग्रंथातून आदिवासी जमातीच्या आर्थिक सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, शोषण, पिळवणूक, स्थलांतर, कपोषण, व विविध समस्येचे विवेचन केलेले आहे.

२. धनजकर राजेश, (२०१३) यांनी ‘मराठवाडयातील आंध जमातीचे लोकसाहित्य’ या ग्रंथातून‘आंध’ जमातीचे लोकगीते, लोकथा, लोकनाट्ये, म्हणी, उखाने, तथा सामाजिक पार्श्वभुमीबाबत विस्तृत विवेचन केलेले आहे.

३. गोरे प्रल्हाद, (२०१८) यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ नांदेड या विदयापीठाच्या समाजशास्त्रीय विषयातील पीएच.डी पदविका करिता 'आंध आदीवासी वृध्दांच्या कौटूंबीक, सामाजिक, आर्थिक समस्याचे समाजशास्त्रीय अध्ययना विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा या विषयावर शोधप्रबंध सादर केलेला आहे. या ग्रंथामध्ये आदिवासी जमातीतील विविध समस्याबरोबर वृध्द व्यक्तींचे प्रश्न यावर सखोल विवेचन केले आहे.

४. गोरे गोविंद, (२००९) यांनी 'पैनगंगा नदीच्याखो-यातील आंध आदिवासी' या या ग्रंथामध्ये आंध जमातीच्या समाजजीवनावर प्रकाश टाकलेला आहे. आंध जमातीतील २४ टक्के कुटुंबे निव्वळ शेती आणि शेतमजूरी या सलग्न व्यवसायावर उदर निर्वाह करतात. शेतीची कामे संपल्यावर २५ ते ३० टक्के पेक्षा अधिक कुटुंबातले मानसे मजूरीसाठी स्थलांतर करतात याच बरोबर आश्रम शाळेतून शिक्षणाचा लाभ मिळत असल्याने त्याच्या साक्षरतेत वाढ होऊ लागली आहे. शासनाच्या नवसंजिवन योजनेमुळे आरोग्य आणि कुपोषणाची स्थिती नियंत्रणात येत आहे.

५. चवरेरा.गो, (२०१०) यांनी आंध जमात: साहित्य आणि संस्कृती या या ग्रंथात शेती आणि अन्य उत्पादनाची साधने आवश्यक गरजा पुर्ततेइतकी नाहीत. विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यात ते कमी पडतात. कुपोषण, कुसंगोपन, उपोषण हे प्रश्न आहेत असे विवेचन केले.

६. शिंदे पंडित, (२००१) यांनी बाबासाहेब आंबेकडकर मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद येथे समाजशास्त्र विषयात पीएच.डी पदवी करीता मराठवाडयातील आंध आदिवासी समुदायातील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास प्रबंध सादर केलेला आहे.

७. कोकाटे चंद्रकांत,(२००८)'हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन' अर्थशास्त्र विभाग,डॉ.बाबासाहेब मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद यांना सादर केलल्या अप्रकाशीत पीएच.डी.प्रबंधनामध्ये आदिवासी समाजातील सिमांत

व अल्पभुधारकाची संख्या अधिक असून शेती व्यवसाय कोरडवाहू स्वरुपाचा आहे. ३८ टक्के कुटुंबे दारीद्रय रेषेखाली येतात. आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनाचा लाभ सर्वच आदिवासी पर्यंत पोहचत नाही.

८. देशमुख सुदर्शन, (२००७) 'आदिवासी समाजाचे दारीद्रय', निर्मल प्रकाशन, नांदेड या संदर्भ ग्रंथातून महाराष्ट्रातील बहुतांश आदिवासी कुटुंबे भुमीहीन असून आदिवासी जवळ जवळ ८० टक्के कुटुंबे अल्पभुधारक असून उपाययोजना क्षेत्रात ९०.८९ टक्के आदिवासी कुटूंबे दारिद्र्य रेषेखाली जिवन जगतात. आदिवासी अर्थाजनाचे शेत मजूरी,जंगल, हे प्रमुख साधन असून अज्ञानामुळे पिळवणूक, निरक्षरता, विकासाविषयी आणि शिक्षणाविषयी उदासिन दृष्टीकोणामूळे मागासलेपण असल्याचा निष्कर्ष निघतो त्यांचा सुधारण्याचा वेग अतिशय मंद आहे.

९. शेकोबा ढोले, (२०१७) आदिवासी विकास योजनांचे मूल्यमापन एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे सादर केलेल्या अप्रकाशीत पीएच.डी. प्रबंधात ७०.५० टक्के कुटुंबाला आर्थिक योजनांचा लाभ मिळत नसुन फक्त ३ टक्के कुटुंबाला तर लघू उद्योगाची साधने प्राप्त झाली. तर ७४.२५ टक्के कुटुंबे शेती व शेतमजुरीवर अवलंबून असून २१ टक्के कुटुंब भुमीहीन व ७२.५० टक्के कुटुंब अल्पभुधारक असून ६६.७५ टक्के कुटुंबाला आदिवासी कल्याणकारी योजनांची माहिती नसल्याचे सांगीतले.

वरील पूर्व संशोधन साहित्य अध्ययनातून असे दिसून येते की, नांदेड जिल्हयाच्या विशेष संदर्भात आदिवासी जमातीचे कल्याणकारी योजनांच्या अनुषंगाने अध्ययन झाल्याचे दिसून येत नाही. नांदेड जिल्हयात आदिवासी जमातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य, दारिद्र्य, कुपोषण, स्थलांतर शोषण, पिळवणूक व व्यसनाधिनता या सारख्या समस्येबाबत फारसे अध्ययन झालेले दिसून येत नाही.

यापुर्वीचे संशोधन व सदर संशोधनात भौगोलिक अध्ययन क्षेत्र, जनसंख्या नमुना, त्यांच्या विविध समस्या अध्ययनाबाबत रिक्त पोकळी झालेली दिसून येते. ही पोकळी भरुन निघावी या करीता संशोधकांनी सदर विषया संदर्भात संशोधन करण्याचे ठरविले.

८. संशोधन पध्दती :

संशोधन करतांना शास्त्रीय पध्दतीचा वापर करणे म्हणजे संशोधन पध्दती होय. प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनातून आरोग्य,दारिद्र्य, कुपोषण, स्थलांतर, आर्थिक, सामाजिक, लोकांचे शैक्षणिक,स्थितीचे अध्ययन सद्य स्थितीत करण्यात येईल. यासाठी नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीच्या लोकांचे सहेतुक नमुना निवड पध्दतीच्या माध्यमातून मुलाखत अनुसूचिव्दारे उत्तरदात्याकडून प्रत्यक्ष माहितीचे संकलन केले जाईल. या सोबतच द्वितीयक तथ्य संकलन पध्दतीचा आधार घेतला जाईल.

८.१अध्ययन क्षेत्र

नांदेड जिल्हयाच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट अंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंश:त तालूके यामध्ये किनवट, माहुर, हदगाव, हिमायतनगर, भोकर या पाच तालूक्याचा समावेश होत असल्याने या तालूक्यातील बहुल आदिवासी लोकसंख्या असलेल्या आदिवासी कुटुंबाची मुलाखत अनूसूची व्दारे सहतुक नमुना निवड पध्दतीने अध्ययन केले जाणार आहे.

८.२ संशोधन आराखडा :

संशोधन संदर्भात पुर्व नियोजन, संशोधनाची दिशा व संभाव्य समस्या संदर्भात केलेली योजना आखणी म्हणजे, संशोधन आराखडा होय. प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनाचे अर्थशास्त्रीय अध्ययन करतांना कौटूंबीक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाची

सद्यस्थिती बाबतचे अध्ययन सहेतुक नमुना निवड पध्दतीने करावयाचे आहे त्यामूळे वर्णनात्मक आणि निदानात्मक या दोन्ही आराखडयाचा समन्वय साधून अध्ययन केले जाणार आहे.

८.३ नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनात वेळ, श्रम व पैशाच्या बचतीकरीता समग्र किंवा विश्वातील काही एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. सदर संशोधनाकरीता नांदेड जिल्हयातील 'आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनाचे अर्थशास्त्रीय अध्ययन' (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयाच्या अध्ययनाकरीता गैर संभाव्यता नमुना निवडीच्या, सहेतूक नमूना निवड पध्दतीव्दारे अध्ययन क्षेत्रातील किनवट, माहूर, हदगाव,हिमायतनगर, भोकर या ०५ तालूक्यातील प्रत्येकी ०४ गावातील १५ कुटुंबे निवडून एका तालूक्यातील ६० कुटुंब अशा रितीने ०५ तालूक्यातील ३०० कुटुंबाचे अध्ययन केले जाणार आहे.

८.४ तथ्य संकलन :

कोणतेही संशोधन तथ्य संकलनावर अवलंबून असते. म्हणून संशोधनात तथ्य संकलनाचे अत्यंत महत्व आहे. सदर संशोधनात आदिवासी जमातीच्या कुटुंबाचे मुलाखत अनुसूची व्दारे प्राथमिक संकलन करण्यात येईल. आदिवासी जमातीच्या कुटुंब प्रमुख व इतर सदस्याकडून महत्वपूर्ण तथ्ये संकलीत केली जातील. यामध्ये आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, कुपोषण, दारिद्र्य, स्थलांतर, शोषण, पिळवणूक, राहणीमान या अनुषंगाने महत्वपूर्ण माहिती संकलीत केली जाईल. या सोबत विविध संदर्भ ग्रंथ वर्तमानपत्रे, कल्याणकारी योजना व त्याचे अहवाल, आदिवासी विकासासंदर्भात कार्य करणारे व्यक्ती व संस्थाव्दारे प्राप्त माहिती यांचे सुध्दा अध्ययन करुन सदर संशोधनासाठी द्वितीय तथ्य संकलीत करण्यात येईल.

प्राथमिक व द्वितीयक तथ्ये संकलीत केल्यानंतर सारणीकरण, सांख्यिकी विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन निष्कर्ष मांडण्यात येतील.

९ प्रकरणाची रचना

१. प्रस्तावना व संशोधन पध्दती.

२. पुर्वसंशोधन साहित्याचा आढावा

३. नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीची पार्श्वभूमी

४. नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचे अध्ययन

५. नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचे विश्लेषण

६. नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीतील आर्थिक, दारिद्रय आणि आरोग्य स्थितीचे विश्लेषण.

७. निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत संशोधनात आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनाचे अर्थशास्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या प्रस्तुत अध्ययन अभ्यास विषयासाठी एकूण सात प्रकरणाची रचना तयार करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिलेप्रस्तावना यामध्ये आदिवासी समाजाचा अर्थ,आदिवासी समाजाची लक्षणे आदिवासी समाजाचे क्षेत्रीय वर्गीकरण, आदिवासी समाजाच्या प्रमुख समस्या, महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमाती, इत्यादी घटकाचे अध्ययन करण्यात येणार आहे.

या शिवायसंशोधन पध्दती या अंतर्गत संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उदिष्टे, संशोधनाची गृहितकृत्ये, संशोधनाचे महत्व, संशोधनाच्या मर्यादा व व्याप्ती याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरेपुर्व संशोधन साहित्याचा आढावा यामध्ये पुर्व संशोधन साहित्याची आवश्यकता, पूर्व संशाधन साहित्याचे अध्ययन, पुर्व संशोधन साहित्याचे मुल्यमापन करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीची पार्श्वभूमी यामध्ये नांदेड जिल्हयाचे स्थान व वैशिष्ट्य, एकूण लोकसंख्या, आदिवासींची लोकसंख्या त्याचे जीवनमान, वैशिष्ट्ये, आदिवासीचे विविध प्रश्न, नांदेड जिल्हयातील प्रमुख आदिवासी जमाती इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथेनांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीच्या कल्याणकरी योजनांचे अध्ययन यामध्ये प्रस्तावना, आदिवासींसाठी कल्याणकारी योजनांचा आढावा, आदिवासी विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, महाराष्ट्रातील आदिवासी विकासासाठी कल्याणकारी योजना, आदिवासी विकासाच्या केंद्रसरकार व राज्य सरकार पुरस्कृत कल्याणकारी योजना इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचे विश्लेषण हे प्रकरण प्राथमिक तथ्य संकलनावर आधारित असून आदिवासी जमातीसाठी सामाजिक व शैक्षणिक स्थितीचे अध्ययनाकरीता वेगवेगळया तथ्यांच्या सहाय्याने प्राप्त माहितीचे विश्लेषण करुन निष्कर्ष काढले जाणार आहे.

प्रकरण सहावे नांदेड जिल्हयातील आदिवासी जमातीतील आर्थिक, दारिद्रय आणि आरोग्य,स्थितीचे विश्लेषण हे प्रकरण प्राथमिक तथ्य संकलनावर आधारित असून आदिवासी जमातीतील आर्थिक, दारिद्रय, स्थलांतर, आणि आरोग्य स्थितीचे मुलाखत अनूसूचिच्या सहाय्याने प्राथमिक तथ्यांचे संकलन करुन विश्लेषणाअंती निष्कर्ष मांडले जाणार आहे.

प्रकरण सातवेनिष्कर्ष व शिफारशी यामध्ये वरिल सर्वच प्रकरणामधून आणि प्राथमिक व द्वियम तथ्य संकलनाच्या माध्यमातून प्राप्त माहिती आधारे अंतिम निष्कर्ष मांडले जाणार असून आदिवासी जमातीच्या कल्याणासाठी आदिवासी कल्याणकारी योजनांची परिपुर्ण अंमलबजावाणी व्हावी या करीता काही महत्वपूर्ण शिफारशी केल्या जाणार आहेत.

संदर्भ ग्रंथसूची

१. आगलावे प्रदिप, (२०००)'सामाजिक संशोधनपध्दतीशास्त्र व तंत्रे,' नागपूर, विदया प्रकाशन.

२. धनजकर राजेश, (२०१३) 'मराठवाड्यातील आंध जमातीचे लोकसाहित्य', नांदेड, अनुराधा पब्लिकेशन.

३. गारे गोविंद, (१९९७) 'आदिवासींचे शिक्षण', औरंगाबाद, साकेत प्रकाशन.

४. गारे गोविंद, (२००१) 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती',पुणे, कौटीनेन्टल प्रकाशन विजयानगर.

५. नाडगोंड गुरुनाथ, (१९७९) 'भारतीय आदिवासी' पुणे, कौटीनेन्टल प्रकाश, विजयानगर.

६. बोबडे प्रकाश, व लोटे रा.ज. (१९९७) 'सामाजिक मानवशास्त्र', नागपूर, पिंपळापुरे आणि कं. पब्लिशर्स (दुसरी आवृत्ती)

७. चवरे रा.गो, (२०१०) 'आंध जमात साहित्य आणि संस्कृती', अमरावती, मराठी जनसाहित्य परिषद.

८. गारे गोविंद, (१९८९) 'आदिवासींची लोकनृत्य', पुणे, कौटीनेन्टल प्रकाशन.

९. गोरे प्रल्हाद, (२०१८) 'आंध आदिवासी वृध्दांच्या कौटूंबीक सामाजिक आर्थिक समस्येचे समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा' पीएच.डी (समाजशास्त्र) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड (अप्रकाशीत पीएच.डी.शोधप्रबंध)

१०. शिंदे पंडित मुंजाजी (२००१) मराठवाडयातील आंध आदिवासी समुदायातील सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यास पीएच.डी. (समाजशास्त्र) डॉ.बाबासाहेब

आंबेडकर मराठवाडा विदयापीठ औरंगाबाद (प्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध).

११. देशमुख सुदर्शन, (२००७) 'आदिवासी समाजाचे दारिद्रय'नांदेड, निर्मल प्रकाशन,

१२. वार्षिक आदिवासी उपयोजना (२०१३-१४) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, पुणे, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय.

१३. आर.सी.वर्मा (२००३) 'भारतीय जमाती काल, आज, आणि उद्या,' नई दिल्ली, प्रकाशन विभाग, सूचना आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

१४. शेकोबा ढोले, (२०१७) आदिवासी विकास योजनांचे मुल्यमापन एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ: नांदेड जिल्हा), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सादर केलेला (अप्रकाशीत) पीएच.डी.शोध प्रबंध.

संशोधक
विकास संभाजी ढोले
सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

मार्गदर्शक
डॉ.डी.के. मगर
पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड